# स्वगत: एक मुक्त चिंतन



♦ बाळकृष्णजी कानोळकार

**...म्हणूनच आज पंचवीस वर्षानंतरही त्यानी जे लिहिले ते वाचकाला मोह घालते, मोहित करते. आकर्षून घेते आणि वाचनानंतर अस्वस्थ करते, विचार करायला लावते. अस्वस्थ करणे, विचार करायला उद्युक्त करणे ह्या श्रेष्ठ साहित्याचा गुणधर्म आहे. आणि म्हणून त्यांनी 'स्वगत' सारख्या स्तंभामधून तत्कालिक प्रतिसादाच्या स्वरूपात केलेले स्फूट लेखनही या श्रेष्ठत्वाच्या सोपानावर जाऊन विराजमान झालेले आहे. तात्कालिकतेच्या मर्यादा भेदून चिरकालिक नि चिंतन झालेले आहे.**

'स्वगत' हे एक स्तंभलेखन. भल्या भल्यांना स्तंभित करणारे स्तंभलेखन. दैनिक नवप्रभाच्या रविवारच्या अंकातून गेली सुमारे पंचवीस वर्षे रवीन्द्रबाबांनी चालविलेले एक अग्निहोत्र. एक विचार 'चंक्रमण'. एखाद दुसरा अपवाद सोडला तर त्यांनी हे अग्निहोत्र अखंडपणे आनी अविरतपणे निरलसपणे आनी निर्भीडपणे चालविले आहे. आपपरतेच्या पलीकडे पोहचलेले ऋषितुल्य रवीन्द्रबाबच ते चालवू शकले. कारण ते एक 'फायटर' आहेत. *सर्जकाची आंतरकथा* या निबंधसंग्रहामध्ये त्यांनी एके ठिकाणी म्हटले आहे की, "मी 'लेखक' नाही. मी स्वत:ला कधीच लेखक मानलेले नाही. लक्ष्मणराव, बाकीबाब , मनोहरराय, पंडित हे लेखक. मी त्या जातकुळीतला नव्हे. मग मी कितीही का लिखाण केले असेना. दोन इंग्रजी शब्दांचा आधार घेऊन मी म्हणत आलेलो आहे, मी कोकणीचा 'रायटर' नव्हे, मी कोकणीचा 'फायटर'... लोकांसमोर - खास माझ्या सख्या सोबत्यांसमोर देखील— माझी प्रतिमा उभी राहिली आहे ती या 'रायटरा'ची, लेखकाची. तीच माझी खरी प्रतिमा."

खरेच आहे, रवीन्द्रबाबानी जे जे लिहिले ते ते अगदी

उसळून लिहिले, अगदी कळवळ्याने लिहिले, निरतिशय प्रांजळपणे लिहिले, हातचे न राखता लिहिले, आपपर न पाहता लिहिले. कोणताही मोह त्यांच्या लेखणीला मोहबंधनात अडकवू शकला नाही, धजला नाही आणि म्हणूनच आज पंचवीस वर्षांनंतरही त्यानी जे लिहिले ते वाचकाला मोह घालते, मोहित करते. आकर्षून घेते आणि वाचनानंतर अस्वस्थ करते, विचार करायला लावते. अस्वस्थ करणे, विचार करायला उद्युक्त करणे हा श्रेष्ठ साहित्याचा गुणधर्म आहे. आणि म्हणून त्यांनी 'स्वगत' सारख्या स्तंभामधून तत्कालिक प्रतिसादाच्या स्वरुपात केलेले स्फूट लेखनही या श्रेष्ठत्वाच्या सोपानावर जाऊन विराजमान झालेले आहे. तात्कालिकतेच्या मर्यादा भेदून चिरकालिक नि चिरंतन झालेले आहे. कारण त्यांनी आपल्या या लेखनातून चिरंतनाचाच - श्रेष्ठ जीवनमूल्यांचाच – सतत निदिध्यास घेतलेला होता आणि आहे. एक ऋषितुल्य जीवन ते जगले. तेच मूल्य त्यांच्या या लेखनालाही प्राप्त झालेले आहे. त्याच्या *ओथांब* या स्फूट लेखसंग्रहाचे परिक्षण करताना 'रवीन्द्रोपनिषद्' असा शब्दप्रयोग मी केला होता. तोच शब्द प्रयोग त्यांच्या 'स्वगत' मधील लेखनाच्या संदर्भातही मला पुनः पुन्हा करावासा वाटतो.

मी त्याना बऱ्याचदा भेटलेलो आहे. त्यांच्याशी बोललेलो आहे. कुवतीनुसार आणि कधीकधी कुवतीबाहेर जाऊनही त्यांच्याशी चर्चा केलेली आहे. परंतु ज्या ज्या वेळी हे घडले त्या त्या वेळी त्यांच्या घरून परत येताना विलक्षण समृद्ध अनुभव माझी सोबत करत होता, काही मौल्यवान विचाररत्ने गांठीला बांधून घेता आली, समकालीन एकूणच परिस्थितीचे आणि पर्यावरणाचे विश्लेषण करण्याची नवी दृष्टी मी घेऊन आलो. आजोबांशी नातवाने बोलावे वागावे तशा या भेटी असत. त्याने मी समृद्ध झालो. जे त्यांच्या बोलण्यात असते तेच त्यांच्या लेखनातही असते हे जाणवले. *'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले'* या जातकुळीतले ते आहेत. आणि म्हणून त्यांचे लेखन 'चाले तैसा चाले-लिहे, स्वरुपाचे आहे.

त्यांच्या लेखनाचे स्वरूप हे 'अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी' या प्रकारचे आहे. *''जे जे आपणासी ठावे । ते ते इतरां शिकवावे । शहाणे करुनि सोडावे अवघे जन ।।''* हा वसाच जणू त्यांनी घेतलेला आहे. त्याच्या मूळाशी आत्मानुभूति आहे, अंतरीचा कळवळा आहे, स्फटिक धवल पारदर्शकता नि निर्मळ मन आहे. विषयानुसार त्यांची लेखणी प्रसंगी *'वज्रादपि कठोराणि'* होते. परंतु त्या कठोरतेचा ओरखडा ते आतल्या नितळ मनावर, कोमल हृदयावर उठू देत नाहीत. किती विषय? राष्ट्रीय अंतर्राष्ट्रीय स्तरावरचे, स्थानिक-प्रादेशिक स्तरावरचे, तात्कालीन, समकालीन, चीरकालीन स्वरुपाचे, समाज-संस्कृति, धर्म-उपासना, समाजकारण, राजकारण, अर्थकारण, संस्कृतिकरण, भाषाकरण, अध्ययन-अध्यापन,व्यक्ती-विभूति, लढे-चळवळी, ग्रंथ-पुस्तके, शोध-संशोध, असे शेकडो विषय त्यांनी या स्तंभलेखनातून आजवर हाताळलेले आहेत, मुखर केलेले आहेत. आणि त्यातून अनेकांच्या अंतर्यामी क्रांतीची स्फुल्लिंगे पेटविली आहेत. विश्रब्ध वार्तालाप मुक्त चिंतन आत्मचिंतन अशा मनन चिंतनपर स्वरुपातले हे लेखन आहे.

महात्मा गांधी, गौतम बुद्ध, स्वामी विवेकानंद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. राममनोहर लोहिया, पंडित जवाहरलाल नेहरू, काका कालेलकर अशा अनेक विभूतिंविषयीं त्यांनी या स्तंभामधून लेखन केलेले आहे. परंतु ते पठडीबद्ध नाही. माहितीपर असूनही त्यापलिकडचे आपण स्वतःला समृद्ध करणारे असे काहीतरी वाचत आहोत याची तीव्र जाणीव वाचकाला झाल्याशिवाय रहात नाही. ते गांधीवादी आहेत. 'गांधी विचारच जगाला तारू शकतो.' या कालातित सत्यावर त्याचा अतूट विश्वास आहे. ते तसे लिहितातही. परंतु तरीही ते पठडीबद्ध गांधीवादी नाहीत याची प्रचीती त्यांच्या गांधी आणि गांधीवाद यासंबंधीच्या लेखनातून आपसूक येते. बुद्धाप्रमाणेच गांधींचाही प्रत्येकाने आपल्या स्वार्थासाठी वापर केला, हे सांगताना, त्यासाठी ते कॉंग्रेस पक्षाला जबाबदार धरतात. आज गांधी-आंबेडकरवादाला जे तोंड फुटले आहे त्याचा दोष गांधीजींची चुकीची प्रतिमा उभी करणाऱ्या कॉंग्रेस पक्षाला गेला पाहिजे असे ते निःक्षून सांगतात. 'गांधी आणि आंबेडकर -परस्पर पूरक' या 'स्वगता'त (२५.८.९१) ते लिहितात,

> ''शिक्षणाचा प्रसार झाला म्हणजे अस्पृश्यांची आर्थिक, सामाजिक स्थिती सुधारायला विलंब लागायचा नाही, पण- प्रश्न येतो तो 'धार्मिक' क्षेत्रांचा. तेथे अस्पृश्य अजून अस्पृश्य राहिलेला आहे. ब्राह्मणांना तेथे जे अधिकार आहेत ते अजून अस्पृश्यांना मिळालेले नाहीत. मंदिरात सहज सुलभपणे त्याना जाता येत असेल. पण अभिषेकाचा अधिकार, मूर्तीला आलिंगन देण्याचा अधिकार, पूजा करण्याचा अधिकार- असले अधिकार अजून त्याना लाभलेले नाहीत.
>
> ते मिळाले पाहिजेत. आणि त्यासाठी गांधी आणि आंबेडकर दोघांच्याही मार्गांचा आपल्याला समन्वय साधता आला पाहिजे. एक मार्ग सवर्णांचा विवेक जागृत करण्याचा आहे. दुसरा, अस्पृश्यांची अस्मिता जागृत करण्याचा आहे. गांधी आणि आंबेडकर, दोघांच्याही भूमिका भिन्न असल्या तरी परस्परपूरक आहेत असे माझे अभ्यासाअंती मत बनलेले आहे. दोघांच्याही भूमिका नीट समजावून घेऊन, शक्तींची वजाबाकी करण्याऐवजी गुणाकार करून आपल्याला पुढे जायचे आहे असे आपण ठरविले पाहिजे. अस्पृश्यता गेली पाहिजे या बाबतीत गांधी आणि आंबेडकर या दोघांचीही तळमळ तीव्र होती हे तथ्य लक्षात ठेवून त्यांच्यामधल्या (त्या काळातल्या) मतभेदाना विसरून आपल्याला एकत्र यायचे आहे, हे आपण विसरू नये.''

त्यांची गांधीवादावरील निष्ठा त्यांच्या लेखनातून सर्वत्रच अधून मधून डोकावतेच. पर्यावरणाचा प्रश्न असो की शेती आणि शेतकऱ्यांचा प्रश्न असो, औद्योगिकरणाचा प्रश्न असो की, शहरीकरणाचा, उद्योग-धंदे वा नोकरी व्यवसायाचा प्रश्न असो, शिक्षण असो की विज्ञान तंत्रज्ञानाचा प्रश्न असो, समाजकारण, धर्मकारण, राजकारण, अर्थकारण अशा मानवी संस्कृतीशी संबंधित अनेकानेक बाबींविषयीचा प्रश्न त्यांना गांधीवादाकडे घेऊन जातो. तेथेच त्याना त्याचा पर्याय वा जबाब सापडतो. त्यांच्यासाठी 'गांधी' कधीच आउटडेटेड झालेला

नाही आणि नसणार. ते लिहितात, ''गांधी आजच्या काळासाठी अपरिहार्य आहेत. तुम्ही त्यांच्यावर प्रेम करा वा द्‌वेष करा, पण त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे तुम्हाला जमणारे नाही.''

'भारतीय प्रकृती, संस्कृती अन् विकृती' (१७.१०.९३) या लेखात ते म्हणतात, ''विवेकानंद गांधीचे सुधारणेचे कार्य सरकारजमा झालेले आहे अन् उद्‌धारकांचे काम काही राजकीय पक्षांनी आपल्या हातात घेतलेले आहे.''

गांधीची ओळख ('एक विश्रब्ध . वार्तालाप', ०३.१०.९२) या लेखात ते लिहितात,


''गांधीना विसरून जा. त्यांच्या काळात त्यानी जे केले ते सारे इतिहासजमा झाले ते तिथेच राहू द्या. आपण आता स्वतंत्ररित्या विचार करायला लागूया. 'इकोलोजी' नावाचे एक विज्ञान अलिकडच्या काळात जगातील विचारवंतांचे ध्यान खेचू लागलेले आहे, हे तुम्हाला ठाऊक आहे ना? तुम्ही त्यासंबंधी ऐकले तरी आहे ना? या विज्ञानाचे म्हणणे असे आहे की मानव जन्माला आला त्याच्या अगोदर लक्षावधी वर्षापासून सृष्टी चालत आली होती. माणूस सर्वात शेवटी आलेला आहे. सृष्टी केवळ त्याच्यासाठी देवाने (किंवा निसर्गाने म्हणा) निर्माण केलेली नाही. मानवाला येथे जगण्याचा जेवढा अधिकार आहे तेवढाच किडी-मुंग्यांपासून हत्ती-गेंड्यांपर्यंतच्या सर्व प्राण्याना आहे. प्राणी-सृष्टी, वनस्पतीसृष्टी अन् जिला तुम्ही 'जड' म्हणता ती सृष्टी यांच्यामध्ये एक संतुलन आहे, हे संतुलन बिघडविण्याचा उपद्‌व्याप न करता माणसाला जगता आले पाहिजे.

'इकोलोजी'चा हा सिद्‌धांत तुम्हाला मान्य आहे ना? नसल्यास तुम्हाला मानव म्हणता यायचे नाही, दानव म्हणावे लागेल. तुम्ही जर मानव असाल-म्हणजे, पशुदशेतून देवदशेत जाणारे प्राणी असाल, तर इकोलोजीचा हा मूलभूत सिद्‌धांत सर्वतोपरी ठेवून तुम्ही तुमची जीवनशैली विकसित कराल. जीव-सृष्टीच्या विकासाच्या (एवोल्यूशनच्या) प्रक्रियेशी ताल धरूनच तुम्ही तुमचे विकासकार्य (डिवेलॉपमेंट) आखाल. सृष्टीत जे आहे ते सर्वांचे आहे. सर्वांसाठी आहे अन् या 'सर्वां'मध्यें तुमच्या नंतर येणाऱ्या असंख्य पिढ्यांचाही समावेश गृहीत आहे.

सृष्टीचे आपण मालक आहोत अशी जर तुमची समजूत झालेली असेल तर ती साफ चुकीची आहे. तुम्ही सृष्टीचे मालक नाही आहात. सेवक आहात, हे लक्षात ठेवा.

एवढे तुम्ही मान्य केले तर तुमचे राजकारण अन् अर्थकारण 'इकोलोजी'च्या तत्वानुसारच तुम्हाला चालवावे लागणार. पृथ्वीला लुटण्याचे सध्या जे उपद्‌व्याप तुम्ही चालवले आहेत ते तुम्हाला आपोआप बंद करावे लागणार. हवा, पाणी अन् जमीन प्रदूषित करणारे अन् ओझोनच्या थराला भोके पाडणारे उद्योगधंदेही तुम्हाला इतिहासजमा करावे लागणार. बस्. तुम्ही इकोलोजी मान्य करा. मग गांधींचे नाव जरी तुमच्या तोंडून निघाले नाही तरी काम मात्र तुम्ही त्यांचेच करणार.

मी म्हणत असतो, गांधींनी अलिकडे नवीन अवतार घेतलेला आहे अन् अिकोलोजी हे या अवताराचे नाव आहे. गांधींची ही अगदीच नवी 'ओळख' आहे.''




या स्तंभामधून केळेकरांनी भारतदेश आणि येथील विविध धर्म आणि पंथ यासंबंधाने विपुल लेखन केलेले आहे. भारताचा अभ्यूदय तेव्हाच शक्य आहे जेव्हा खरे भारतीयत्व उदयाला येईल असे सांगताना आपल्या 'तेव्हाच खरे भारतीयत्व उदयाला येईल' या लेखात ते म्हणतात, ''हिंदू हा खरा हिंदू झाला पाहिजे. आजचा हिंदू विवेकानंदाच्या अनुयायांनाही आपल्यापासून दूर ढकतलो. चित्र पार बदलले पाहिजे. तेव्हाच या देशात खरे भारतीयत्व उदयाला येईल.''

रवीन्द्रबाब म्हणत, ''प्रत्येक लेखकाने सामाजिक बांधिलकी अंगिकारणे गरजेचे आहे कारण तो केवळ आपल्या लेखनाद्‌वारे वाचकांचे मनोरंजन करणारा विदूषक नाही. लेखक हा समाजाचा अध्यापक आहे आणि या समाजाच्या स्मृतिकारावर नैतिकदृष्ट्या सकस असलेले लेखन करण्याची जबाबदारी आहे.'' खुद्द रवीन्द्रबाब या व्रताला जागलेले आहेत. गोमंतकातील इतर राज्यातील वा केंद्रातील बरबटलेल्या राजकारणावर व राजकारण्यांवर प्रसंगी आसूड ओढायला त्यानी मागेपुढे पाहिले नाही. 'राजकारणाच्या अपराधीपणाचे गुन्हेगार' (२४.९.९५) या लेखात पंडित नेहरूंकडे यासंदर्भात अंगुलीनिर्देश करून ते लिहितात,

''जवाहरलाल सत्तेच्या खुर्चीवर बसल्यावर ते (स्वातंत्र्य-संग्रामाच्या चळवळीत पडलेले व्यवहारवादी) आपापल्या

प्रदेशातल्या सत्तेच्या खुर्चीवर दृष्टी ठेवून जवाहरलालजींची खुशामत करीत राहिले. जवाहरलाल मूळचे ध्येयवादी. पण थोडासा व्यवहारवाद (ज्याला ते प्रॅग्माटिझम् म्हणायचे) त्यांच्यामध्ये घुसला होता. 'खुर्चीवर दृष्टी ठेवणे स्वाभाविक आहे.' असे म्हणून त्यांनी या व्यवहारवादी लोकांकडे डोळेझांक केली. परिणामत: बरेचसे ध्येयवादी स्वातंत्र्यसैनिक काँग्रेसमधून बाहेर पडले, विरोधी पक्षात जाऊन बसले. अन् जवाहरलालजींना या व्यवहारवादी सहकाऱ्यांवरच अधिकाधिक विसंबून रहावे लागले.

आता हेच लोक 'राजकारणाचे अपराधीकरण कसे झाले' याचा शोध लावायला बसले आहेत. गृहस्थांनो, ज्या व्यवहारवादाच्या मदतीने तुम्ही पुढे आलात तोच तुम्हाला इथपर्यंत घेऊन आलेला आहे हे तुम्हाला ठाऊक नाही काय? कसला शोध लावला? स्वत:कडे जरा बघा, तुम्ही निवडून कसे येता हे पहा, म्हणजे अपराधीकरणाला कोण जबाबदार आहेत ते तुम्हाला आढळून येईल. तुम्ही स्वत:च याला कारणीभूत आहात. अलीकडच्या काळातला सर्वात मोठा घोटाळा - जो 'हवाला घोटाळा' या नावाने ओळखला जातो - त्यात कुणाकुणाचे हात बरबटलेले नाहीत? नरसिंहरावांचे बरबटलेले आहेत. देवीलाल, चंद्रशेखर, सुब्रह्मण्य स्वामी - फार कशाला, लालकृष्ण अडवाणींचेही बरबटलेले आहेत. सुप्रीम कोर्टात ही केस अजून भिजत पडलेली आहे. तिचा निकाल अजून का लागत नाही? तुमचा व्यवहारवादच तुम्हाला काळ्या पैशाकडे घेऊन गेलेला आहे. तुमचा व्यवहारवादच राजकारणाच्या अपराधीकरणाला कारणीभूत झालेला आहे. चंद्रस्वामींकडे तुम्हा सर्वांना कोण घेऊन गेला? व्यवहारवादच ना? हा व्यवहारवाद सोडण्याची हिंमत तुमच्यामध्ये आहे काय?''

तुकाराम, नामदेव, ज्ञानेश्वर, कबीर,चक्रधर इत्यादी संत आणि त्यांचे कार्य केळेकरांच्या चिंतनाचा विषय झालेले आहेत. 'ब्राह्मणशाहीच्या नादीरशाहीत' या लेखमालेतून त्यांनी याविषयी या स्तंभातूनच लिहिलेले आहे. त्याच प्रमाणे गोव्यात येण्यासाठी धडपडणाऱ्या नायलॉन ६,६ सारख्या बहुराष्ट्रीय कंपनीच्या विरोधात त्यानी सातत्याने लिहिलेले असून अशा प्रकारच्या लोकलढ्यात नेतृत्व करणे सुळाकरची पोळी कसे आहे हे सांगत असताना नायजेरियातल्या केन सारोविवा या लोकनायकाची ते वाचकाना ओळख करून देतात. (९.६.९६)

त्यांनी विविध प्रकारचे लेखन केलेले असले तरी जर कधी काळी 'समग्र रवीन्द्र साहित्य' संग्रहित करण्याचे ठरले तर त्यामध्ये फक्त आपल्या चिंतनपर साहित्याचा समावेश करू असे त्यांनी एके ठिकाणी म्हटलेले आहे. 'स्वगत' मधून त्यांनी मराठी भाषेतून जे 'नवप्रभा'त लिहिले त्याच विषयावर किंबहुना बरेचसे हुबहु वा स्वैर अनुवाद वाटावे असे लिखाण त्यांनी 'जाग' या कोकणी मासिकाच्या 'नदर संपादप्याची' या संपादकीयातूनही पुन:सर्जित केलेले आहे. परंतु त्यातूनही वाचनीयता, विचारप्रेरकता व स्फोटकता हे त्यांच्या लेखनाचे 'फायटर' गुणविशेष प्रकर्षाने जाणवल्याशिवाय रहात नाहीत.

त्यांच्या या 'स्वगता'चा मी एक नियमित वाचक. एखादा लेख चुकला तर चुटपुट लागून रहाते. तो कधी एकदाचा मिळवून वाचेन असे होते. त्यांच्या सहवासापूर्वीच त्यांचा सार्थ परिचय त्यांच्या या 'स्वगत' शील लेखनातून फार पूर्वीच मला झाला. कोणताही विषय त्यांच्या लेखणीला कधीही वर्ज्य नव्हता आणि नाही. कोकणी लढ्याच्या पर्वाचे तर ते निशाणच होते. 'त्यांचे लेखन नव्या पिढीकडून कितपत वाचले जाते याचा हिशेब मांडला तर पदरी निराशाच येण्याची जास्त शक्यता आहे.' अशी आशंका त्यांच्या एका वाचकाने (नवप्रभा, ११ फेब्रुवारी २००१) व्यक्त केलेली आहे.

परंतु मला वाटते ती अनाठायी आणि अकाली आहे. नपेक्षा अविचलपणे पंचवीस वर्षांपेक्षा अधिक काळ त्यांचा हा 'स्तंभ' वाचकांना प्रेरणा देत उभाच राहिला नसता. तो नरसिंहाचा स्तंभ आहे.

पंचवीसेक वर्षांच्या या अक्षरहोत्रात त्यांनी सुमारे बाराशेच्या आसपास लेख लिहिले. त्यांच्यातील विषयवैविधता आणि विषयसयुक्तता, काळसापेक्षता ही तर लक्षणीय आहेच शिवाय अगदी थोडक्यात त्यांच्या या लेखनाची गुण वैशिष्ट्ये नोंदवावयाची म्हटले तरी खुपच मोठी सूची होईल. गहन तत्त्वचिंतन, सखोल विवेचन, मनमुक्त वार्तालाप, प्रवाही निवेदन, प्रभावी विषयप्रतिपादन, प्रांजळ मत प्रदर्शन, प्रखर देशभक्ती, करारी स्वाभिमान, वस्तुनिष्ठता, धीर गंभीर परिणामकारक परंतु सहजशैली, साधी सोपी सरळ ओघवती परंतु प्रभावी भाषा ही त्यापैकी काही ठळक म्हणून सांगता येतील.

त्यांच्या या लेखनामधून त्यांच्या व्यक्तित्त्व आणि व्यक्तिमत्वाच्या विविध पैलूंचे तेजस्वी दर्शन होते. गांधीवादावरची ध्रूव-अढळ विश्वासयुक्त श्रद्धा, तत्त्वनिष्ठा, साधुत्त्व, मानवतावादी धारणा, साधेपणा, दीनबंधुता, वृत्तिगांभीर्य, प्रखर राष्ट्राभिमान, अक्षर संस्कारितता, अनाग्रहीवृत्ती, कणखर बाणा, कमालीचा आत्मविश्वास, बहुश्रुतता, बहुभाषिकता, सहानुभूति इत्यादी गुणसमच्चयांचा एकत्रित असा सुखद सहवास त्यांच्या या 'स्तंभ-सांधिन्या'त वाचकाला लाभतेच.

रवीन्द्रबाबाना आपल्या या लेखनाचे मूल्य आणि महत्व पुरेपुर ठाऊक आहे. आणि म्हणूनच त्यानी ते अमृतनिष्ठेने अव्याहतपणे चालू ठेवलेले आहे. त्यांच्या कालजयी वकुबाविषयी ते निर्भर-निश्चिंत आहेत. आणि म्हणूनच ते याविषयी म्हणतात, ''माझे लेखन हे केवळ आजच्या पिढीसाठी नसून पन्नास वर्षांनंतर माझे साहित्य वाचणारा वाचक त्याचा कशा प्रकारे स्वीकार करील हेही माझ्यासाठी महत्त्वाचे आहे, कारण जर त्याला माझ्या लेखनातून मी एक सामान्य दर्ज्याचे लिखाण करणारा सामान्य लेखक आहे असे वाटत राहिले तर तो लेखक म्हणून माझा पराभव ठरेल.'' आणि मला खात्री आहे की त्यांच्या कालजयी लेखणीचा, स्फोटक शब्दब्रह्माचा असा पराभव कालत्रही होणे नाही.